## प्रेस नोट दिनांक ०४/०६/२०१८

### महिलेचा खून करून पुरावा नष्ट करणेसाठी मृतदेह नदी पात्रात टाकणाऱ्या दोन आरोपीस कोणताही पुरावा नसतांना, युनिट - १, गुन्हे शाखा, पुणे शहरने ठोकल्या बेडया

डेक्कन पोलीस ठाणे हद्दीत चार दिवसापूर्वी एका अज्ञात महिलेचा खून झाले बाबत अज्ञात इसमा विरुध्द गुन्हा दाखल होता, सदर गुन्हयाचा समांतर तपास युनिट १ करीत होते. सदर महिलेची मयत बॉडी पाण्यामध्ये सडून गेलेली होती, तिच्या उजव्या हातावर फक्त संजय असे नांव मराठीत गोंदलेले होते. त्यामुळे प्रथमतः तिची ओळख पटविणे व त्यानंतर तिचा खून कोणी केला आहे, याबाबत तपास करणे खूपच आव्हाणात्मक होते. कोणताही धागादोरा उपलब्ध नसतांना, गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस हवालदार प्रकाश लोखंडे यांनी त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत माहिती काढली असता, सदर महिला ही बुधवार पेठ पुणे येथे काम करत असलेबाबत समजले. त्यानंतर पो.हवा. लोखंडे यांनी बुधवार पेठेमध्ये जावून व्यवसाय करणाऱ्या इतर महिलांकडे जावून उजव्या हातावर कोणी संजय असे गोंदलेली महिला आहे किंवा कसे, याबाबत माहिती घेतली असता, सदर मृत महिलेचे नांव श्रीमती मिरा उर्फ सिमा संजय वाघचौरे, रा. भिमनगर, ता. दौंड, जि. पुणे असे असून कधीकधी ती बुधवार पेठ, पुणे येथे येत असेलेचे तिच्या मैत्रीणीकडून समजले व त्यावरून सदर मृत महिलेचा मोबाईल नंबर मिळाला होता.

मृत महिलेच्या मोबाईल नंबरचा पो.ना. सुधाकर माने यांनी माहिती घेवून त्याचा अगदी बारकाईने अभ्यास करुन, घटनेच्या दिवशी सदर मृत महिलेस ज्यांनी कॉल केला होता, त्यांची तांत्रीक माहिती घेवून तपास केला असता, संशयीत इसम नामे १) सैदाब हमीद खान, वय २३ वर्षे, धंदा वेल्डींग काम, २) आबीद इम्रान खान, वय २२ वर्षे, रा. दोघेही कामठे पाटील नगर, कोंढवा, पुणे यांना ताब्यात घेवुन, त्यांना विश्वासात घेवून अधिक तपास केला असता, त्यांनी सदर गुन्हयाची कबुली दिली. सदर महिलेच्या आर्थिक कारणावरुन, त्यांच्यामध्ये किरकोळ शाब्दीक वाद तसेच ' मला माझे ठरलेले पैसे दया, नाहीतर मी तुमची पोलीसात तक्रार करेल' या कारणामुळे भितीने आरोपीतांनी सदर महिलेचा गळा दाबुन खून केला व पुरावा नष्ठ करण्याच्या हेतुने तिचे शरीराचे हात-पाय बांधुन मृत बॉडी पोत्यात भरुन, म्हात्रे पुलावर घेवुन जावुन, रात्री ०३/०० वाजणेचे सुमारास नदिपात्रात टाकुन दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदरचें दोन्हीही आरोपी हे मुळचे उत्तर प्रदेशचे रहाणारे असून, ते त्यांच्या मुळ गांवी पळून जांणेचे तयारीत असतांनाच युनिट १ च्या अधिकारी व कर्मचारी यांनी कोंढवा येथे सापळा रचुन, त्यांना शिताफीने पकडले आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, दिनेश पाटील व हर्षल कदम, व पोलीस कर्मचारी प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, सचिन जाधव, गजानन सोनुने, इरफान मोमीन, सुधाकर माने, तुषार माळवदकर, प्रशांत गायकवाड, विजेसिंग वसावे, सुभाष पिंगळे, अशोक माने, रिजवान जिनेडी, तुषार खडके, श्रीकांत वाघवले, यांनी केली आहे.

पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पुणे शहर


पुणे शहर पोलीस